## नि.दि.मु.क्र. १४६/२०१० मधील निशाणी २८१ वरील आदेश

वादीने प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र. २७ ही मयत असल्याने व वादी आणि प्रतिवादी क्र. २८ ते ३३ हेच तिचे वारस असल्याने प्रतिवादी क्र. २७ च्या नावापुढे 'मयत म्हणून प्रतिवादी क्र. २८ ते ३३ व वादी हेच वारस आहेत' अशी दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्र. १ ने तीव्र आक्षेप घेवून प्रतिवादी क्र. २७ चे कायदेशीर प्रतिनिधी मुदतीत रेकॉर्डवर न आणल्याने दावा अबेट झालेला आहे असा आक्षेप घेतलेला आहे. तसेच प्रतिवादी क्र. १ चे असे म्हणणे आहे की अबेटमेंट रद्द होवून वारस अभिलेखावर आणण्यासाठी झालेला विलंब माफ करुन घेणे आवश्यक आहे. त्याशिवाय प्रस्तुत अर्ज चालण्याजोगा नाही.

०२. दोन्ही बाजूंच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकून मी अभिलेखाचे अवलोकन केले. वादीच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादी क्र. २७ चे कायदेशीर प्रतिनिधी यापुर्वी वादी व प्रतिवादी क्र. २८ ते ३३ म्हणून प्रकरणात दाखल आहेत. प्रस्तुत अर्जान्वये वादी कोणतेही नवीन कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर आणण्याची विनंती करीत नाही. त्याचप्रमाणे वादी केवळ प्रतिवादी क्र. २७ मयत असून तिचे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर असणाऱ्या पक्षकारांपैकी कोण आहेत याबाबतची दुरुस्ती करुन मागत आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ ने घेतलेला आक्षेपाची बाधा प्रस्तुत अर्जास येणार नाही असे मला वाटते. ही बाब खरी आहे की प्रतिवादी क्र. २७ विरुध्द दावा अबेट झालेला आहे. मात्र प्रतिवादी क्र. २७ चे कोणतेही नवीन कायदेशीर प्रतिनिधी वादी अभिलेखावर आणत नसल्याने कायदेशीर प्रतिनिधी आणण्यासाठी झालेला विलंब माफ करुन घेण्याची

आवश्यकता राहत नाही. सबब, वरील सर्व विवेचनावरुन अर्ज मंजूर करण्यात येतो. वादीने प्रस्तावित दुरुस्ती दाव्यामध्ये त्वरीत करावी व दुरुस्त दाव्याची प्रत पुढील तारखेस अथवा तत्पुर्वी सादर करण्यात यावी.

Digitally signed by Bhanupratap Basantsingh Chouhan
Date: 2021.02.03 16:35:04 +0530

दि. ०३/०२/२०२१ भानुप्रताप ब. चौहान

मालवण दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर

“CERTIFIED TO BE TRUE AND CORRECT COPY OF THE ORIGINAL SIGNED ORDER/JUDGMENT.”

Chandrakala Vasant Chavan
NAME OF STENOGRAPHER